# महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ

हुतात्मा बाबू गेनू मुंबई गिरणी कामगार क्रीडा भवन, सेनापती बापट मार्ग,
एलफिन्स्टन, मुंबई ४०००१३

जा.क्र.:मका/कार्यक्रम/२०१५-१६/१०९३ दिनांक २३/७/२०१५

## परिपत्रक

### विषय :- ६३ वा नाटय महोत्सव - प्राथमिक स्पर्धा - २०१५-१६

मंडळाच्या वतीने सन २०१५-१६ चालू आर्थिक वर्षात ६३ वा नाट्य महोत्सव - प्राथमिक स्पर्धेचे मंडळाच्या सर्व विभागिय कार्यालयांच्या स्तरावर माहे नोव्हेंबर / डिसेंबर २०१५ मध्ये आयोजन करण्यात यावे.

चालू आर्थिक वर्षापासून औद्योगिक व व्यावसायिक कामगारांसाठी स्वंतत्रपणे आयोजित करण्यात येणारी नाट्य स्पर्धा बंद करण्यात आलेली आहे. त्यामुळे औद्योगिक व व्यावसायिक कामगार व कर्मचाऱ्यांच्या नाट्य संघाना त्यांच्या आस्थापनांच्या नावाने आस्थापने मार्फत विभागीय स्तरावरील प्राथमिक स्पर्धेत प्रवेश देण्यात यावा.

नाट्य महोत्सवाच्या नियम व अटी पुढील प्रमाणे राहतील

### पात्रता

१) नाटकात भूमिका करणारे ५० टक्के कलाकार महाराष्ट्र कामगार कल्याण निधी अधिनियम १९५३ च्या कक्षेत येणारे कामगार/कर्मचारी किंवा त्यांच्यावर अवलंबून असणारे त्यांचे कुटुंबिय असलेच पाहिजेत. (त्यात स्त्री कलाकाराची गणना केली जाणार नाही) व प्रत्येक कलाकारास कामगार किंवा कामगार कुटुंबिय असल्याचे तसेच कामगार कल्याण निधी भरत असल्याचे प्रमाणपत्र सादर करावे लागेल.

### खुलासा

अ) कलाकार या व्याख्येत दिग्दर्शक तसेच नाटकाच्या पडद्यामागील इतर तांत्रिक कलाकारांचा सामावेश केला जाणार नाही.

ब) नाट्य संस्था धंदेवाईक नसावी. तसेच तिचे कलाकार हे हौशी कलाकार असले पाहिजेत आणि ते सर्व त्या संस्थेचे अधिकृत सभासद असावे.

क) एखादी नाट्य संस्था खाजगी किंवा एकापेक्षा जास्त व्यक्तिंच्या भागीदारीत मुख्यतः आर्थिक दृष्टीने चालविलेली असेल तर ती संस्था ठेकेदार पध्दतीची नाट्य संस्था मानण्यात येईल.

ड) जो कलाकार स्वतःच्या उपजिवीकेसाठी मुख्यतः नाटक, दूरदर्शन किंवा चित्रपटातील भूमिकेच्या मिळणाऱ्या उत्पन्नावर अवलंबून नसेल त्यास हौशी कलाकार म्हणून मानण्यात येईल.ज्या कलाकाराने नाटक, दूरदर्शन किंवा चित्रपट संस्थेत मासिक वेतनावर किंवा करार पध्दतीवर किंवा रात्र वेतनावर १०० पेक्षा अधिक प्रयोगात काम केलेले असेल तर त्यास हौशी कलाकार मानण्यात येणार नाही.

इ) १) कामगार कुटुंबियांच्या व्याख्येत त्या कामगाराची पत्नी किंवा पती, त्यांच्यावर अवलंबून असलेली मुले यांचाच समावेश केला जाईल.

२) पुरुष कलाकारांना फक्त एकाच नाट्य संघातून भाग घेता येईल.

३) कोणत्याही स्त्री कलावंतास कल्याण आयुक्तांच्या लेखी परवानगीशिवाय नाट्य महोत्सवात एकापेक्षा अधिक नाट्य संघातून भाग घेता येणार नाही.

**प्रवेशिका**

१) इच्छुक संघाने आवेदन पत्राच्या नमुन्यातच (तीन प्रतीत) अर्ज केला पाहिजे व तो जवळच्या कामगार कल्याण केंद्राच्या प्रमुखांकडे दिलेल्या मुदतीत किंवा तत्पुर्वी पोहचेल अशा तऱ्हेने पाठविला पाहिजे. संबंधित केंद्र प्रमुखाने एक अर्ज आपल्या कार्यालयाच्या दप्तरी ठेवून इतर दोन अर्ज संबंधित कामगार कल्याण अधिकाऱ्यांकडे पाठवावेत. संबंधित गट कार्यालयाच्या अधिकाऱ्यांने त्यांच्याकडे आलेल्या अर्जांची छाननी करुन योग्य असलेले अर्ज संबंधीत सहाय्यक कल्याण आयुक्तांच्या कार्यालयाकडे सादर करावा. अंतिम तारखेनंतर किंवा अपूर्ण माहितीसह लिहलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

अ) स्पर्धेत नविन नाटकांचा प्रथमच प्रयोग सादर केला जात असल्यास त्या नाट्य प्रयोगास ५ अतिरिक्त गुण दिले जातील तथापी असा नाटकाचा प्रथम प्रयोग होत असल्यासंबंधीचा दाखला नाटककाराकडून मिळवून तो संबंधित अधिकाऱ्याकडे सादर करण्याची जबाबदारी नाट्य संघावर राहील.

ब) ज्या कलाकाराला कामगार कल्याण मंडळाच्या अंतिम नाट्य स्पर्धेत सतत ३ वर्षे अभिनयाचे प्रथम पारितोषिक मिळाले असेल त्या कलाकारास १ वर्ष या स्पर्धेत भाग घेता येणार नाही.

क) २५ पेक्षा कमी गुण मिळविणाऱ्या नाट्य संघाला पुढील वर्षी स्पर्धेतून बाद करण्यात येईल.

२) सदर नाट्य स्पर्धेत सहभागी केंद्राच्या नाट्य संघास प्रवेश शुल्क रु.५०/- ( रुपये पन्नास) व औद्योगिक व व्यावसायिक कामगारांच्या नाट्य संघास प्रवेश शुल्क रु.२००/- (रुपये दोनशे) फक्त आकारण्यात येईल. सदरचे प्रवेश शुल्क प्रवेशिके सोबत भरण्याची जबाबदारी संबधित केंद्र प्रमुखाची राहिल.

३) नाट्य महोत्सवात भाग घेवू इच्छिणाऱ्या नाट्य संघांनी आपल्या प्रवेश अर्जासोबत नाट्य स्पर्धेत सादर करावयाच्या नाट्य संहितेच्या दोन सुवाच्य अक्षरातील प्रती पाठविणे आवश्यक आहे.

४) एका आस्थापनेच्या नावाने एकच संघ सहभागी करुन घेण्यात येईल.

५) औद्योगिक व व्यावसायिक कामगारांच्या नाट्य संघांनी आपल्या प्रवेशिका जवळच्या कामगार कल्याण केंद्रामार्फत अनामत रक्कम रु.५०००/- (रुपये पाच हजार) फक्त व प्रवेश शुल्क रु. २००/- (रुपये दोनशे) फक्त प्रवेशिकेसह पाठविले पाहिजे.

६) स्पर्धेत भाग घेणाऱ्या संस्थेने नाटकासाठी अनामत म्हणून भरलेली रक्कम नाटक सादर केल्यावर परत मिळविण्यासाठी त्या अनामत रकमेची मुळ पावती जोडून त्या त्या केंद्रामार्फत संबंधित गट कार्यालयाकडे अर्ज करावा. नाट्य संस्थेला स्पर्धेत भाग घेण्यास निवड होऊनही नाटक सादर न केल्यास अनामत रक्कम परत केली जाणार नाही. अनामत रक्कम भरण्याबाबतची अट केंद्राच्या नाट्य संघापुरती शिशिल करण्यात आली असली तरी त्या केंद्राच्या नाट्य संघाचा प्रयोग सादर करण्याची संपुर्ण जबाबदारी संबंधीत केंद्र प्रमुखावर राहील. केंद्राचे नाटक सादर न झाल्यास संचालकास प्रवेश फी परत मिळणार नाही. तसेच बाहेरील नाट्या संघाप्रमाणेच त्यांनाही अनामत रक्कम आकारली जाईल व ती मंडळात भरणा करावी लागेल.

७) नाट्य महोत्सवात भाग घेणाऱ्या नाट्य संघास रंगभूमी परिक्षण मंडळाचे प्रमाणपत्र किंवा त्याची साक्षांकित प्रत व लेखकाच्या परवानगी पत्राची साक्षांकित प्रत जोडावी. त्या शिवाय प्रवेशिका स्वीकारली जाणार नाही.

८) सर्व नाट्य संस्थांना नाटकातील पात्रांची संपूर्ण नावे, कलाकार कामगार/कुटुंबिय असल्या बद्दलचा दाखला ते ज्या संस्थेत/ आस्थापनात काम करीत असतील त्यांचेकडून मिळवून ते कलाकार करीत असलेल्या भुमिकांच्या तपशिलासह सादर करावा लागेल.

९) केंद्र संघाच्या बाबतीत सर्व प्रवेशाच्छुक कलाकार हौशी असल्याबद्दलचा व संघाचे कलाकार प्रत्यक्ष कामगार किंवा त्यांच्यावर अवलंबून असणारे त्यांचे कुटुंबिय असल्याचा दाखला केंद्र प्रमुखाला द्यावा लागेल. कामगार कलाकांराचा कामगार कल्याण निधी कपात केल्याचा माहे जून / डिसेंबर २०१५ च्या वेतनाचा दाखला अथवा या बाबतीत व्यवस्थापनेचा दाखला जोडण्यात यावा. त्या शिवाय नाट्य संघास प्रवेश देता येणार नाही.

तसेच प्रवेशेच्छुक कलाकार अर्ज करावयाच्या तारखेपूर्वी किमान ३ महिने अगोदर केंद्राचा नियमित सभासद असल्या बद्दलचा नोंदणी क्रमांक व दिनांक नमुद करुन केंद्र प्रमुखाने दाखला दिला पाहिजे.

## नाटकाचे स्वरुप व कालमर्यादा इत्यादिबाबत

१) सर्वसाधारणपणे समाजाच्या सांस्कृतिक, बौद्धिक, सामाजिक आणि आर्थिक जीवनाच्या उन्नतीसाठी सहाय्यभूत होऊ शकतील अशी नाटके निवडण्यात यावीत. कामगार जीवनावर आधारलेल्या नाटकांना तसेच व्यावसायिक रंगभूमीवर सादर न झालेल्या नाटकांना प्रथम प्राधान्य दिले जाईल.

२) मंडळाने पुर्वी आयोजित केलेल्या नाट्यमहोत्सवात एखाद्या नाटकास प्राथमिक किंवा अंतिम स्पर्धेत पारितोषिक मिळालेले असेल आणि तेच नाटक त्याच संघाने सादर केल्यास ते स्वीकारले जाणार नाही.

३) प्रत्येक नाट्यसंघाने आपल्या पसंतीच्या क्रमानुसार तीन नाटकांची नांवे प्रवेशिकेत द्यावीत. पहिले अथवा दुसरे नाटक स्वीकारले गेले नाही तर तिसरे नाटक विचारात घेतले जाईल. जे नाटक निवडले जाईल तेच नाटक संस्थेला सादर करावे लागेल.

४) कामगार नाटककारांच्या नाट्य लेखनास तसेच कामगारोत्तर नाटककारांनी कामगार जीवनावर लिहिलेल्या नाट्य लेखनास प्रोत्साहान देण्याच्या दृष्टीने काही अटीवर विशेष पुरस्कार देण्यात येतील

५) मध्यांतर सहित नाटक २ तासांपेक्षा कमी किंवा ३ तासापेक्षा अधिक असू नये. प्रत्येक मध्यंतर १५ (पंधरा) मिनिटांपेक्षा अधिक व अशी मध्यतंरे दोनापेक्षा अधिक असू नये.

६) नाटकाची कालमर्यादा तिसऱ्या घंटेपासून ते नाटकाच्या शेवटच्या अंकाचा पडदा पडेपर्यंत धरण्यात येईल.

## महत्वाच्या अटी

१) चालू आर्थिक वर्षात आयोजित करण्यात आलेल्या नाट्य महोत्सवातील प्राथमिक स्पर्धेत नाट्य प्रवेश देण्यापूर्वी संबधित कामगार कल्याण अधिकारी यांनी नाटकांची प्रत्यक्ष तालीम पाहून ज्या नाटकास प्राथमिक स्पर्धेत प्रवेश देण्याबाबत शिफारस करील अशाच नाट्य संघाना स्पर्धेत प्रवेश देण्यात येईल.

२) नाट्य महोत्सवाच्या स्पर्धेसाठी निवडलेल्या संघाना निश्चित केलेल्या दिवशी नाटक सादर करण्याबाबत लेखी हमी द्यावी लागेल व त्याबाबत कोणत्याही कारणास्तव माघार घेता येणार नाही. माघार घेतल्यास ती संस्था व त्या संस्थेच्या नाटकात भाग घेतलेल्या कलाकारांना पुढील दोन वर्षे प्रवेश नाकारण्याचा हक्क कल्याण आयुक्तांना राहिल.तसेच त्या दिवशी नाट्यप्रयोगासाठी मंडळाने केलेला खर्च सबंधीत नाट्य संस्थेकडून किंवा केद्र प्रमुखाकडून वसूल केला जाईल.

अ) अंतिम नाट्य स्पर्धेत प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळविणाऱ्या नाट्य संस्थेवर पारितोषिक वितरण समारंभ प्रसंगी मंडळाने सांगितल्यास प्रयोग करणे बंधनकारक राहील.

३) प्राथमिक स्पर्धेत जे नाटक सादर केले जाईल ते नाटक जर अंतिम स्पर्धेसाठी निवडले गेले तर प्राथमिक स्पर्धेच्या वेळी त्या नाटकात ज्या कलाकारांनी भाग घेतला असेल त्याच कलाकारांनी अंतिम स्पर्धेत भाग घेतला पाहिजे. एखाद्या कलाकारास काही आकस्मिक घटनेमुळे नाटकात काम करणे अशक्य झाले तर कल्याण आयुक्तांच्या लेखी पुर्व परवानगीशिवाय नवीन कलाकरास अंतिम स्पर्धेत भाग घेता येणार नाही. कल्याण आयुक्तांच्या लेखी पुर्व परवानगीशिवाय जर एखाद्या नविन कलाकाराने अंतिम स्पर्धेत भाग घेतल्याचे निदर्शनास आले तर सदर नाटक स्पर्धेतून बाद करण्यात येईल.

४) नाट्य स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक देण्यायोग्य नाटक जर सादर केले गेले नाही तर प्रथम क्रमांकाचा निर्णय न देता व दुस-या व तिस-या क्रमांकाची नाटके जाहिर केली जातील.

५) प्राथमिक स्पर्धेत भाग घेणा-या नाट्य संस्थेला अंतिम स्पर्धेत प्रवेश मिळविण्यासाठी एकूण गुणाच्या कमीत कमी ५०टक्के गुण मिळवावे लागतील. अन्यथा तो संघ प्राथमिक स्पर्धेत पहिला आला असला  तरी त्याला अंतिम स्पर्धेत पाठविता येणार नाही.

६) प्रथम क्रमाकांत आलेले व अंतिम स्पर्धेसाठी निवडलेले नाटक एखाद्या कारणास्तव बाद झाले तर त्याऐवजी पुढील क्रमांकाचे नाटक घेतले जाणार नाही.

७) प्राथमिक स्पर्धेसाठी मंडळाकडून तज्ञ परिक्षक नेमले जातील. काही अपरिहार्य कारणामुळे जर एखादा परिक्षक गैरहजर असेल तर हजर असणा-या परिक्षकांनी दिलेल्या गुणांची सरासरी काढून ती  सरासरी गैरहजर असणा-या परिक्षकाचे गुण मानले जातील.

८) प्रत्येक विभागिय कार्यालयाच्या स्तरावर कमीत कमी ८ नाटके सादर करणे आवश्यक आहे. त्यापेक्षा कमी नाटके असल्यास त्या केंदावर स्पर्धा न घेता जवळच्या विभागातील केंद्रावर प्रवेश देण्यात येईल.

९) कोणतेही कारण न देता आपल्या अधिकारात महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ एखाद्या नाट्य संघास / संस्थेस प्रवेश नाकारु शकेल पण अशा वेळी त्या संघाने / सस्थेने भरलेली प्रवेश फी व अनामत रक्कम परत केली जाईल. नकाराचे कारण देण्याचे बंधन मंडळावर राहणार नाही.

१०) नाट्य स्पर्धेसाठी १ दर्शनी पडदा,१ फ्लॅटसीन सेट,काळा पडदा,सर्व साधारणपणे विजेचे दिवे,६ स्पॉट, ६ डिमर,१ सोफासेट, टिपॉय, ध्वनीक्षेपणाची व्यवस्था मंडळाकडून करण्यात येईल. या व्यतिरिक्त लागणा-या साधनसामुग्रीची व्यवस्था सदर संघास करावी लागेल

११) अंतिम नाट्य स्पर्धेसाठी प्रत्येक विभागातून
अ) १० पर्यंत नाटके झाल्यास  प्रथम क्रमांकाच्या १ नाटकास
ब) ११ ते १८ नाटके झाल्यास  प्रथम व व्दितीय क्रमांकाच्या एकूण २ नाटकास
क) १८ पेक्षा जास्त नाटके झाल्यास प्रथम , व्दितीय , तृतीय क्रमांकाच्या अशा एकूण ३ नाटकास अंतिम स्पर्धेत प्रवेश देण्यात येईल.

१२) स्पर्धेत प्रवेश देण्याबाबत तसेच निकाल व पारितोषिकांबाबत कल्याण आयुक्तांनी दिलेला निर्णय अंतिम राहिल व तो निर्णय सर्व स्पर्धकांना बंधनकारक राहील.

१३) केंद्र प्रमुखांनी त्यांना प्राप्त झालेल्या प्रवेशिका त्यांच्या गटाच्या कामगार कल्याण अधिकाऱ्यां अवगत कराव्यात व अधिका-यांनी प्रवेशिका योग्य असल्याची खात्री करून घ्यावी. त्यानंतरच केंद्र प्रमुख्यांनी प्रवेश फी व अनामत रक्कमेची पावती फाडून सदर प्रवेशिका गटाकडे दिनांक १० नोव्हेंबर,२०१५ पर्यंत पाठव्यावात. गट प्रमुख्यानी प्रवेशिका स्विकारुन त्या दि.१५ नोव्हेंबर,२०१५ पर्यंत विभागिय कार्यालय येथे पाठवाव्यात. विभाग प्रमुखानी संबधित गटाकडून प्राप्त झालेल्या प्रवेशिका व एकत्रित प्रस्ताव त्यांच्या अभिप्रायासह दि. २० नोव्हेबर २०१५ पर्यत मध्यवर्ती कार्यालयास सादर करावा.

१४) विभागिय स्तरावर प्राथमिक नाट्य महोत्सवाचे आयोजन माहे नोव्हेंबर / डिसेंबर २०१५ मध्ये करणे आवश्यक आहे.

१५) सकाळचे किंवा दुपारचे सत्रात कोणत्याही परिस्थितीत नाटकांची स्पर्धा घेऊ नये. नाटक फक्त संध्याकाळी ७.०० नंतर घेण्यात यावे.

१६) स्पर्धेत भाग घेणारे नाट्य संघाना सादरीकरण खर्च रु.५०००/- व संघातील कलांवत अधिक ४ साथीदार मिळून जास्तीत जास्त२० कलावंताना मंडळ अनुषंगिक खर्च मंजूर करील. हा खर्च आपल्या केंद्र ठिकाणाहून निघाल्यापासून परत आपल्या केंद्रात पोहचेपर्यंत प्रतिदिनी प्रत्येकी रु.१००/- (रुपये शंभर ) प्रमाणे दिला जाईल. त्याचप्रमाणे ४०० किंवा त्याहून अधिक किलोमीटर प्रवास करणाऱ्या केंद्राच्या नाट्य संघातील कलाकारांना दुसऱ्या वर्गाचे रेल्वे भाडे व तिकीट आरक्षण व स्लीपरचे शुल्क मंजूर करण्यात येईल. मात्र आरक्षणाची पावती द्यावी लागेल. या शिवाय अन्य कोणतीही सवलत नाट्य संघाना दिली जाणार नाही.

१७) प्राथमिक नाट्य स्पर्धा ह्या मंडळाच्या ७ विभागिय स्तरावर घेण्यात येतील. अंतिम नाट्य स्पर्धेचा कालावधी व स्थळ स्वतंत्र पत्राने कळविण्यात येईल.

प्राथमिक नाट्य महोत्सवातील विजेत्या संघाना व कलावंताना खालीलप्रमाणे बक्षिसे देण्यात येतील.

| क्र. | बक्षिस | बक्षिसाची रक्कम | | |
|---|---|---|---|---|
| | | प्रथम | व्दितीय | तृतीय |
| १ | उत्कृष्ट नाट्य प्रयोग | १०००० | ७००० | ५००० |
| | उत्तेजनार्थ - २ पारितोषिके<br>(प्रत्यक्षात ९ किंवा त्यापेक्षा जास्त नाटके सादर झाल्यास) | ३००० प्रमाणे | | |
| २ | उत्कृष्ट अभिनय पुरुष | १५०० | १००० | ७०० |
| | उत्तेजनार्थ - १० पारितोषिके | ५०० प्रमाणे | | |
| ३ | उत्कृष्ट अभिनय महिला | १५०० | १००० | ७०० |
| | उत्तेजनार्थ - ५ पारितोषिके | ५०० प्रमाणे | | |
| ४ | उत्कृष्ट दिग्दर्शन | २००० | १५०० | १००० |
| ५ | उत्कृष्ट नेपथ्य | १५०० | १००० | ७०० |
| ६ | उत्कृष्ट पार्श्वसंगीत | १५०० | १००० | ७०० |
| ७ | उत्कृष्ट प्रकाश योजना | १५०० | १००० | ७०० |
| ८ | उत्कृष्ट नाट्यलेखन | २००० | | |
| ९ | सादरीकरण खर्च | ५००० | | |

वरील प्रमाणे नियम व अटींचे तंतोतंत पालन करून विभाग प्रमुखानी ६३ व्या नाटयस्पर्धेचे आयोजन करावे. खर्चाचे प्रस्ताव मध्यवर्ती कार्यालयास सादर करतांना स्पर्धेचे स्थळ, कालावधी, नाट्य संघांची संख्या, प्रवेश दिलेल्या नाट्यसंस्थेच्या प्रवेशिका झेरॉक्स प्रती, नाटय संघातील कलावंत का.क.निधी भरीत असल्याचा पुरावा, दरपत्रकासह खर्चाचा सविस्तर तपशिल नमुद करण्यात यावा.

विभाग स्तरावरील नाट्य महोत्सवासाठी लागणारी सहभागाची / बक्षिसाची प्रमाणपत्रे विभागस्तरावर छापून घेण्यास मान्यता देण्यात येत आहे. या प्रमाणपत्रासाठी येणारा खर्च प्रस्तावात नमुद करावा.

तरी सर्व विभाग / गट व केंद्र प्रमुखांनी आपल्या केंद्र व कार्यालयाच्या परिसरात मंडळाच्या ६३ व्या प्राथमिक नाट्य स्पर्धेची प्रसिद्धी करून जास्तीत जास्त नाट्य संघ स्पर्धेत सहभागी होणासाठी प्रयत्न करून स्पर्धा यशस्वी करावी.

सोबत :- प्रवेशिका नमुना

कल्याण आयुक्त

प्रत,

१) लेखा व लेखा परिक्षा अधिकारी, मध्यवर्ती कार्यालय, मुंबई
२) सहायक कल्याण आयुक्त, कार्यक्रम मध्यवर्ती कार्यालय, मुंबई
३) प्रसिद्धी व जनसंपर्क अधिकारी, मध्यवर्ती कार्यालय, मुंबई
४) सहायक कल्याण आयुक्त,विभागिय कार्यालय,ठाणे/मुंबई/नागपूर/नाशिक/पूणे/ कामगार क्रीडा भवन, मुंबई
१) प्रभारी सहायक कल्याण आयुक्त,विभागिय कार्यालय, अकोला /औरंगाबाद
२) सहायक लेखा अधिकारी, सर्व विभागिय कार्यालये.
३) कामगार कल्याण अधिकारी (१८ गट कार्यालये).★★★
४) सर्व केंद्र प्रमुख

★★★ यांनी सदरचे परिपत्रक केंद्र प्रमुखांना उपलब्ध करुन द्यावे.

# महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ

## प्रवेशिका

### नाट्य महोत्सव सन २०१५-२०१६

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. | केंद्राचे/संस्थेचे संपूर्ण नांव | : | | |
| २. | संपूर्ण पत्ता | : | | |
| ३. | दूरध्वनी/भ्रमणध्वनी क्रमांक | : | | |
| ४. | सादर करु इच्छिणा-या नाटकाचे नाव (पसंतीच्या क्रमानुसार ) | : | नांव | लेखक |
| | | १) | | |
| | | २) | | |
| | | ३) | | |
| ५. | नाटकाचा वर्ग - पौराणिक/ ऐतिहासिक / सामाजिक /इतर | : | | |
| ६. | दिग्दर्शकाचे संपूर्ण नांव | : | | |
| ७. | नेपथ्यकाराचे संपूर्ण नांव | : | | |
| ८. | पाश्वसंगीतकाराचे संपूर्ण नांव | : | | |
| ९. | प्रकाश योजनाकाराचे संपूर्ण नांव | : | | |
| १०. | मध्यांतर वगळून नाटकास लागणारा वेळ | : | | |
| | अ) मध्यांतरास लागणारा एकूण वेळ | : | | |
| | ब) एकूण मध्यांतर किती | : | | |
| ११. | नाटकाची प्रवेशिका सादर करण्यापूर्वी नाटकाच्या किती तालमी झाल्या ? | : | | |
| १२. | नाटकाची किंवा हस्तलिखिताची प्रत जोडली आहे का ? | : | होय /नाही | |
| १३. | लेखकाच्या संमतीच्या प्रमाणपत्राची साक्षांकित नक्कल प्रत जोडली आहे का ? : | : | | |
| १४. | रंगभूमी प्रयोग परिनिरीक्षण मंडळाचे प्रमाणपत्र जोडले आहे काय ?( सेन्सॉर सर्टिफिकेट ) | : | होय /नाही | |
| १५ | प्रवेश शुल्क भरणा केल्याचा पावती क्रमांक व दिनांक | : | | |
| १६ | अनामत रक्कम भरणा केल्याचा पावती क्रमांक व दिनांक | : | | |

**१७) भूमिकाची माहिती**

| अ.क्र. | कलावंताचे संपूर्ण नांव | भूमिका | हौशी | कलावंताचा व्यवसाय | केंद्राचासभासद क्र. | का.क.निधी भरणा केल्याचा तपशिल. |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. |
| २. | | | | | | |
| ३. | | | | | | |
| ४ | | | | | | |
| ५. | | | | | | |
| ६. | | | | | | |
| ७. | | | | | | |
| ८. | | | | | | |
| ९. | | | | | | |
| १० | | | | | | |
| ११ | | | | | | |
| १२ | | | | | | |
| १३ | | | | | | |
| १४ | | | | | | |
| १५ | | | | | | |
| १६ | | | | | | |
| १७ | | | | | | |
| १८ | | | | | | |
| १९ | | | | | | |
| २० | | | | | | |

टिप : सभासद नोकरी करीत नसल्यास पालकांचा व्यवसाय लिहावा व व्यवस्थापनाचा दाखला जोडावा .

| | |
|---|---|
| १८. | वरील नाटकात भूमिका करणारे कलाकार ( महाराष्ट्र कामगार कल्याण निधी अधिनियम १९५३ च्या कलम २ (२ ) नुसार कामगार/कर्मचारी या व्याख्येत बसतात कां ? होय/नाही<br>(कलम (२) ची टिप : कामगार/कर्मचारी म्हणजे प्रत्यक्षपणे मालकाकडून किंवा कंत्राटदारामार्फत किंवा इतर कोणत्याही एजन्सीमार्फत एखाद्या व्यापारी संस्थेत कसबी किंवा बिनकसबी, अंगमेहनतीचे, कारकुणी, पर्यवेक्षकीय किंवा तांत्रिक काम करण्यासाठी मजूरीने किंवा बक्षिस देऊन कामावर लागलेली कोणतीही व्यक्ती ) |
| १९. | संस्थेने सादर केलेल्या नाटकापैकी एखाद्या नाटकास महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या स्पर्धेत पूर्वी बक्षिस मिळालेले आहे काय ? मिळाले असल्यास खालील प्रमाणे माहिती द्यावी. |

| अ.क्र. | नाटकाचे नांव | वर्ष | प्राथमिक / अंतिम स्पर्धा क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | | | |
| २ | | | |
| ३ | | | |

| | |
|---|---|
| २०. | आवश्यक वाटल्यास संस्थेची अधिक माहिती आवेदन पत्राला वेगळी जोडून पाठविण्यात यावी. |

# प्रतिज्ञापत्र

असे प्रतिज्ञापत्र लिहून देतो की, आम्ही प्रवेशिकेत दिलेली माहिती खरी व बरोबर आहे. आम्हास नाट्य संघाच्या नियम व अटी माहित आहेत व त्या मान्य आहेत. आमच्या नाटकाची निवड झाल्यास ६३ वा नाट्य महोत्सवाच्या प्राथमिक स्पर्धेत मंडळाने ठरविलेल्या अटीवर व दिलेल्या तारखेस नाटक सादर करु अशी आम्ही हमी देतो.

व्यवस्थापकाची सही : नाट्यसंघ प्रमुखाची सही :

दिनांक :

व्यवस्थापनेचे नांव :

उपरोक्त नाटक ------------------------------------------------------------
स्पर्धेच्या नियम व अटीनुसार खात्री करुन देण्यांत येऊन ६३ वा नाट्य महोत्सवाच्या प्राथमिक स्पर्धेत प्रवेश देण्यांत आला आहे.

कामगार कल्याण अधिकारी